सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दुरध्वनी क्र. - ०२४५६-२२१७४४
पोलीस नियंत्रण कक्ष - ०२४५६- २२०२३२

महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली

E-mail Id- sp.hingoli@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव
शाखा :- आस्थापना-१

आपु क्रमांक २५३ /२०२२

जा.क्र. आस्था-१/पोशि ते पोना/पदो./२०२२
पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली
दिनांक १७/०२/२०२२

संदर्भ :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.०७.०५.२०२१.
२. दिनांक ०३.११.२०२१ रोजी विभागीय पदोन्नती निवड समितीने घेतलेला निर्णय.

---oo---

## आदेश

खालील नमूद पोलीस शिपाई यांना आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून वेतन मॅट्रीक्स **एस-८ रु.२५५००-८११००** मध्ये " **पोलीस नाईक** " या पदावर निव्वळ तात्पूरती पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नतीनंतर ते सध्या जेथे कार्यरत आहेत त्यांना त्याच ठिकाणी नेमण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवडसूचि यादीतील क्रमांक | पोलीस नाईक यांचे नाव व नेमणुकीचे ठिकाण | जात / प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ४१ | पोशि/८५५ शिवशंकर कोंडीबा गायकवाड | मराठा (खुला) | पोना/२०० रावसाहेब रामराव सुर्यतळ यांचे नियत वयोमान सेवानिवृत्तीमुळे रिक्त पदी ( बिंदु क्रं १९८ खुला ) |

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.०७.०५.२०२१ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील आरक्षित पदे रिक्त ठेऊन खुल्या प्रवर्गातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात आली आहेत.

**जे मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी / कर्मचारी जे दि.२५.०५.२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.०५.२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठते नुसार पुढील पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला आहे व दि.२५.०५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला आहे.**

सदरील आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञया याचिका क्रमांक क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत. सबब सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत पोलीस शिपाई यांना नियमित पदोन्नीचे म्हणजे सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

वर नमूद पोलीस शिपाई यांना मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिक क्रमांक २८३०६/२०१७ वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं बीसीसी-१२०७/प्र.क्र ५३/०८/१६-ब,दि १६.०६.२००८ नुसार त्यांचेपेक्षा ज्येष्ठ असलेले निवडसुचीतील अ.क्र ८ पोशि/४२३ राहूल भिमराव नरवाडे अ.क्र.१९ पोशि/८७७ संदिप दुधानंद करवंदे यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्याने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी खालील अटींच्या अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

१) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून संबंधित ज्येष्ठ कर्मचाऱ्यांने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावर ती आपोआप संपुष्टात येईल.
२) सदर पदोन्नती (११) महिन्यांकरिता व ज्येष्ट कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र सादर करेल यापैकी जे आगोदर घडेल तो पर्यंत सुरु राहील तथापि या कालावधीत ज्येष्ठ कर्मचाऱ्यांने जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास ही पदोन्नती १ दिवसाचा (सुट्टीचा कालावधी वगळून) खंड देऊन चालू ठेवता येईल.
३) या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी कनिष्ठ कर्मचारी यांना सेवाज्येष्ठतेचा हक्क मिळणार नाही.
४) संबंधित मागास कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यास पदोन्नती देण्यात येईल व कनिष्ठ कर्मचाऱ्यांची तात्पुरती पदोन्नती संपुष्टात येईल. सदर ज्येष्ठ कर्मचारी यांची पदोन्नतीच्या पदावरील ज्येष्ठता अबाधित राहील.

वर नमूद **पोलीस शिपाई** हे कोणत्याही प्रकारच्या रजेवर किंवा गैरहजर असल्यास ते हजर झाल्याच्या दिनांकापासून त्यांना पदोन्नती लागू होईल.

वर नमूद पदोन्नती देण्यात आलेल्या **पोलीस शिपाई** यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांचे विरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालू असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात संपुष्टात येणारी नसेल तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

**वर नमूद पदोन्नती देण्यात आलेल्या पोलीस शिपाई यांना पोलीस नाईक पदाची पदोन्नती स्विकारल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसाच्या आत मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर करणे बंधनकारक असून, मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केल्यानंतरच वर नमूद पदोन्नती झालेले पोलीस शिपाई यांची वेतननिश्चिती करण्यात येईल व सदरचे मत्ता व दायित्वचे विवरणपत्र दिलेल्या मुदतीत सादर न केल्यास वर नमूद पोलीस शिपाई यांना देण्यात आलेली सदरची पदोन्नती ही रद्द करण्यात येईल.**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२,दि.१२.०९.२०१६ नुसार पदोन्नती झालेल्या पोलीस अंमलदार यांचेपैकी कोणी पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शविल्यास, त्याचे नाव पदोन्नतीसाठी असणाऱ्या निवडयादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षे होणाऱ्या निवडसुच्यांमध्ये त्याचे नावाचा विचार केला जाणार नाही.

शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक पीएएचवाय/१०८२/सीआर/११००(२)/एईआर-०३,दि.०६.११.१९८४ अन्वये पदोन्नती नंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम,२०१९ मधील नियम १३ अन्वये केली जाईल याची नोंद घ्यावी.

**पोलीस नाईक** पदावर पदोन्नती झालेल्या **पोलीस शिपाई** यांचे पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**(एम.राकेश कलासागर)**
**पोलीस अधीक्षक, हिंगोली**

प्रति,
पोशि/८५५ शिवशंकर कोंडीबा गायकवाड.
मार्फत :- प्रभारी अधिकारी, पो.स्टे.गोरेगाव.
प्रत :- आ.पु./जिपोप / वेतन लिपीक
प्रत:- संगणक विभाग.
२/- सदरचे आदेश **hingolipolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिदध करावेत.
प्रत :- पोलीस नियंत्रण कक्ष, हिंगोली
२/- त्वरित प्रसारणाकरिता.